मफुकृवि ई वार्ता
जून २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : ६, जून २०२१ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि मंत्री मा. ना. श्री. दादाजी भुसे यांच्या उपस्थितीत आढावा बैठकीचे आयोजन









**दि. २८ जून, २०२१.** आपल्या राज्यातील ७५ टक्के कुटुंब हे शेतात आणि शेतीशी निगडीत कार्य करतात. राज्यातील ५० टक्क्याचे वर रोजगार निर्मिती ही शेतीत होते. मा. मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार शेतकरी हा अन्नदेवता आहे. कृषि विद्यापीठ, कृषि विभाग आणि शेतकरी हे एक कुटुंब आहे. आपण सर्वांनी शेतकऱ्यांचे कष्ट कसे कमी करता येतील, त्यांचे उत्पादन आणि उत्पन्न कसे वाढवता येईल यासाठी संशोधन आणि कार्य करणे गरजेचे आहे. आपण सर्वांनी कष्टकरी शेतकरी म्हणजेच अन्नदेवतेसाठी काम करणे हे पुण्याचे काम असल्याचे प्रतिपादन राज्याचे कृषि मंत्री ना. श्री. दादाजी भुसे साहेब यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठात आढावा बैठकीला प्रमुख मार्गदर्शन करतांना राज्याचे कृषि मंत्री ना. श्री. भुसे साहेब बोलत होते. यावेळी व्यासपीठावर राज्यमंत्री, नगर विकास, उर्जा, आदिवासी विकास, उच्च व तंत्र शिक्षण, आपत्ती

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष : १, अंक क्रं. : ६, जून २०२१

व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन ना.श्री. प्राजक्तदादा तनपुरे, विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील, संचालक संशोधन व विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, कृषि विभागाचे संचालक श्री. विकास पाटील उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना कृषि मंत्री ना. श्री. दादाजी भुसे पुढे म्हणाले की महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे शेतकऱ्यांसाठी कार्य फार मोठे आहे. पण यापुढे नाविण्यपुर्ण संशोधनाला चालना देणे गरजेचे आहे. यामध्ये शेतकऱ्यांचा वेळ वाचवणारे, कमी खर्चाचे आणि शेतकऱ्यांना शेतीवर वापरता येईल असे सूक्ष्म सिंचन पध्दती विकसीत होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे विद्यापीठाच्या बियाण्यावर विश्वास असून त्याची मागणी मोठ्या प्रमाणावर आहे. विद्यापीठांनी जास्तीत जास्त मुलभुत बियाण्याचे उत्पादन वाढवावे. आता शेतकरी बाजारपेठेच्या मागणीनुसार नविन पिकांची मागणी करत आहे यासाठी परदेशी भाजीपाला व फळ यावर कृषि विद्यापीठांनी आपले संशोधन करावे. यासाठी बाहेरच्या देशातून काही वाण आणण्याची गरज असली तर त्यासाठी विशेष बाब म्हणुन परवानगी देण्यात येईल. मा. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार विकेल ते पिकेल या सदराखाली बाजारपेठेच्या मागणीनुसार वाण विकसीत करणे, परदेशी पिकांचा संशोधनात आंतरभाव करणे व त्याचा शेतकऱ्यांपर्यंत प्रसार करणे आवश्यक आहे.

याप्रसंगी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले मा. कृषि मंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सूचनेनुसार कृषि विद्यापीठामध्ये विविध संशोधन, शिक्षण व विस्तार कार्य प्रगतीपथावर सुरु आहे. विद्यापीठाच्या संशोधनाला गती देण्यासाठी बंद झालेला विद्यापीठ आकस्मीक निधी पुन्हा सुरु करणे आवश्यक आहे. याचबरोबर विद्यापीठ मॉडेल ॲक्ट अमलात आणला तर कृषि विद्यापीठांना सहाय्य होईल. कृषि विद्यापीठाच्या संशोधन, शिक्षण आणि विस्ताराला अधिक चालना देण्यासाठी विद्यापीठातील ५० टक्के जागा रिक्त असलेल्या जागा भरण्यास शासन स्तरावर परवानगी मिळावी. याप्रसंगी वेळोवेळी कृषि मंत्र्यांनी केलेल्या सूचनेनुसार विद्यापीठाने संशोधन विस्तार आणि शिक्षणात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालक संशोधन डॉ. शरद गडाख यांनी सादर केला. याप्रसंगी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे हस्ते कोव्हीड–आपत्तीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला विद्यापीठ कर्मचाऱ्यांचा रु. ६५ लक्ष चार हजारचा धनादेश कृषि मंत्र्यांना सुपूर्त करण्यात आला.

यावेळी मा. मंत्र्यांच्या हस्ते विद्यापीठाच्या उद्यानविद्या विभागाच्या प्रक्षेत्रावरील विविध फळपिकांचे प्रात्यक्षिक प्रकल्पाचे उद्‌घाटन करण्यात आले. यानंतर त्यांनी विद्यापीठाच्या कास्ट–कासम प्रकल्पाला भेट दिली. या आढावा बैठकीस कृषि विभागाचे संचालक फलोत्पादन श्री. कैलास मोते, विशेष कार्य अधिकारी श्री. रफिक नायकवाडी, श्री. सुधाकर बोराळे, विद्यापीठाचे सर्व सहयोगी अधिष्ठाता व विभाग प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पंडित खर्डे यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. महानंद माने यांनी मानले.

मफुकृवि ई वार्ता
जून २०२१
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ६, जून २०२१

## आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा



**दि. २१ जून, २०२१.** योग हा भारताने जगाला दिलेली देणगी आहे. आपल्या शारिरीक आणि मानसिक स्वाथ्यासाठी योग आवश्यक असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना, डॉ. आण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, पदव्युत्तर महाविद्यालय आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हळगाव यांच्या संयुक्तरित्या आयोजीत सातव्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. महानंद माने, सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, डॉ. प्रमोद रसाळ, डॉ. श्रीमंत रणपिसे, नियंत्रक श्री. विजय कोते, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक व विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. महावीरसिंग चौहाण, क्रीडा अधिकारी प्रा. पुष्पशील शेळके, प्रा. दिलीप गायकवाड आणि प्रसारण केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते.


कुलगुरु डॉ. पाटील पुढे म्हणाले की सद्य परिस्थितीत कोरोनापासून बचाव करण्यासाठी आपली प्रतिकारशक्ती वाढविणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येकाने दररोज नियमितपणे योगा व प्राणायम साधना केल्यास आपण या परिस्थितीचा सामना करु शकू. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योग्य अंतर ठेवत मोजक्या अधिकाऱ्यांना योग शिक्षक श्री. सुरेश शेडगे आणि डॉ. देवेंद्र वंजारी यांनी योग साधनांचा अभ्यास दिला. सदर कार्यक्रमाचा लाभ ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या दहा जिल्ह्यातील अधिकारी, शास्त्रज्ञ आणि कर्मचाऱ्यांनी घेतला. कास्ट प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. सुनिल गोरंटीवार आणि संशोधन सहयोगी डॉ. मोहसीन तांबोळी यांनी कार्यक्रमाच्या ऑनलाईन पध्दतीसाठी सहाय्य केले. प्रास्ताविक व स्वागत डॉ. महावीरसिंग चौहाण यांनी केले तर प्रा. दिलीप गायकवाड यांनी आभार मानले.

मफुकृवि ई वार्ता
जून २०२१

वर्ष :१, अंक क्रं. : ६, जून २०२१  महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## पाणलोट जलविज्ञान प्रतिमाने विषयावर ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





**दि. ७ जून, २०२१.** जलविज्ञान प्रतिमाने, सुदुर संवेदन व भौगोलिक माहिती प्रणाली इ. गोष्टींचे प्रशिक्षण, पाणलोट क्षेत्र विकासासाठी नक्कीच मदत करतील आणि प्रशिक्षार्थींनी ह्या तीन आठवड्याचा ऑनलाइन प्रमाणपत्र अभ्यासक्रमात मिळालेल्या ज्ञानाचा वापर करून आपापल्या भागातील पाणलोट क्षेत्र विकासासाठी करावा असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील जागतिक बँक अर्थसहाय्यित राष्ट्रीय कृषी उच्च शिक्षण प्रकल्प व भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने हवामान अद्ययावत शेती व जलव्यवस्थापनाचे आधुनिक कृषी विज्ञान व तंत्रज्ञान केंद्राद्वारे पाणलोट जलविज्ञान प्रतिमाने या विषयावर तीन आठवड्याचा ऑनलाईन प्रमाणपत्र अभ्यासक्रम आयोजित केला गेला. या अभ्यासक्रमाच्या समारोप प्रसंगी अध्यक्षीय

मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन नवी दिल्ली येथील भारतीय कृषी अनुसंधान परिषदेचे उपमहासंचालक डॉ. सुरेशकुमार चौधरी तसेच प्रमुख अथिती म्हुणुन नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कृषी उच्च शिक्षण प्रकल्पाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. प्रभातकुमार उपस्थित होते. या प्रसंगी अधिष्ठाता (कृषी) डॉ. अशोक फरांदे, कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार तसेच महाराष्ट्रातील इतर कृषी विद्यापीठातील अधिकारी व भारतातील नामांकित संशोधन संस्थांमधील शास्त्रज्ञ उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. सुरेशकुमार चौधरी यांनी नैसर्गिक संसाधने व्यवस्थापन: समस्या; आणि शाश्वत आधारवर उत्पादकता वर्धित होण्याची संभावना या विषयावर मुख्य व्याख्यान दिले. डॉ प्रभातकुमार यांनी जलविज्ञान प्रतिमाने हा शाश्वत शेती विकासाचा महत्वाचा भाग असल्याचे म्हटले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. अशोक फरांदे यांनी केले. प्रकल्पाचे सहसमन्वयक डॉ. उल्हास सुर्वे यांनी प्रकल्पाची माहिती दिली. या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी देशभरातून एकूण ९६ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते व त्यांना पाणलोट जलविज्ञान प्रतिमाने या विषयातील देशभरातील तज्ञ वैज्ञानिकांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

या अभ्यासक्रमाचे संयोजक म्हणून डॉ सुनिल गोरंटीवार, प्रकल्प प्रमुख (कास्ट), संचालक म्हणून डॉ मुकुंद शिंदे, प्रकल्प सहप्रमुख (कास्ट) व डॉ अतुल अत्रे, प्राध्यापक (मृदा व जलसंधारण अभियांत्रिकी), सहसंचालक म्हणून डॉ प्रमोद पोपळे, सहाय्यक प्राध्यापक यांनी काम पहिले. या कार्यक्रमाचे आभार डॉ. अतुल अत्रे यांनी मानले तर सूत्रसंचालन डॉ. मंगल पाटील यांनी केले. तसेच या अभ्यासक्रमाचे नियोजन इंजि. कल्पेश बोरसे, डॉ मंगल पाटील, डॉ वैभव मालुंजकर, डॉ राजेश जयरामन, डॉ चैतन्य पांडे व इंजि. मोहसीन तांबोळी यांनी केले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या कांदा बियाणेची ऑनलाईन विक्री

**दि. १४ जून, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आणि संशोधन संचालक डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली कांदा बियाण्यांची ऑनलाईन विक्री केली. नोंदणीसाठी पोर्टल सकाळी अकरा वाजता सुरु झाल्यानंतर अवघ्या एक तासातच बियाणे संपले. कांदा बियाणे विक्री https://www.phuleagromart.org या पोर्टलवरुन करण्यात आली. महात्मा फुले कृषि विद्यापीठाने उत्पादित केलेल्या फुले समर्थ आणि फुले बसवंत ७८० या वाणाच्या कांदा बियाण्याची ऑनलाईन विक्री करण्यात आली. ऑनलाईन पध्दतीने ५९ लाख रुपयांच्या कांदा बियाण्यांची विक्री झाली. खरीप हंमागातील बियाण्यांची ३००६ बॅगची विक्री होवून २२ लाख २५ हजार रुपयांची बियाणे विकी झाल्याची माहिती प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. आनंद सोळंके यांनी दिली. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या बसवंत ७८० या कांदा बियाण्यास राज्यभरातून मोठी मागणी आहे. बीड, पुणे, नाशिक, अहमदनगर, औरंगाबाद, सातारा, सोलापूर, परभणी आदी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. ऑनलाईन नोंदणी झालेल्या ग्राहकांना कृषि विज्ञान केंद्र, धुळे, पिंपळगाव बसवंत कांदा संशोधन केंद्र, नाशिक व राहुरी विद्यापीठ प्रक्षेत्रातील केंद्रातून या बियाण्यांचे वितरण करण्यात आले.

मफुकृवि ई वार्ता
जून २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ६, जून २०२१

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या हस्ते सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार विद्यापीठ वाहनाने सेवानिवृत्त मजुरांना घरी पोहचविण्याची व्यवस्था



**दि. ३० जून, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ कार्यक्षेत्रात ३० जून रोजी १० अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले. निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी निवृत्तीनंतरदेखील आपला ज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी करावा. निवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांनी आपले आरोग्य जपावे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावर अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. महानंद माने, नियंत्रक श्री. विजय कोते उपस्थित होते. सेवानिवृत्तीच्या दिवशी सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचा आदेश, रजा रोखीकरणाचा आदेश आणि भविष्य निर्वाह निधीचा आदेश देण्यात आले. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सामाजीक अंतर पाळून प्रातिनिधीक स्वरुपात काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. सेवानिवृत्तीच्या दिवशी निवृत्ती आदेश मिळाल्याने निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. निरोप समारंभानंतर कुलगुरु डॉ. पाटील यांच्या सूचनेनुसार सेवानिवृत्त मजूर श्रीमती शांता तोडमल, श्री. रोहिदास बर्डे व त्यांच्या कुटुंबाना विद्यापीठाच्या वाहनाने घरी पोहचविण्यात आले. त्यामुळे या सेवानिवृत्त मजुरांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत आणि सूत्रसंचालन कुलसचिव डॉ. महानंद माने यांनी केले आणि आभार नियंत्रक श्री. विजय कोते यांनी मानले. या कार्यक्रमाला कोव्हीड-१९ परिस्थितीमुळे मोजके कर्मचारी सामाजीक आंतर ठेऊन उपस्थित होते.

## सेवानिवृत्तीच्या दिवशी मिळाला सेवानिवृत्तीचा आदेश



**दि. ३१ मे, २०२१.** सेवानिवृत्तीनंतर निवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या कागदपत्रांची पुर्तता करण्यास मोठा कालावधी जातो. त्यामुळे निवृत्त कर्मचाऱ्याला मानसीक त्रास होतो. यासाठी येथून पुढे सेवानिवृत्तपुर्ततेचे काम कार्यालय करणार आणि सेवानिवृत्तीच्याच दिवशी सेवानिवृत्तीचा आदेश, रजा रोखीकरणाचा आदेश आणि भविष्य निर्वाह निधीचा आदेश हे तीन्ही आदेश निवृत्तीच्याच दिवशी देण्यात येतील. निवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांनी निवृत्तीनंतरदेखील आपला ज्ञानाचा उपयोग शेतकऱ्यांच्या उद्धारासाठी करावा. निवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांनी आपले आरोग्य जपावे असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ३१ मे रोजी ५२ अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाले. यावेळी या सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीचा आदेश देण्याच्या कार्यक्रमात अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. महानंद माने, नियंत्रक श्री. विजय कोते उपस्थित होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठात ३१ मे रोजी १२ अधिकारी व ४० कर्मचारी सेवानिवृत्त झाले. विद्यापीठाच्या इतिहासामध्ये प्रथम सेवानिवृत्तीच्या दिवशी सेवानिवृत्तीचा आदेश, रजा रोखीकरणाचा आदेश आणि भविष्य निर्वाह निधीचा आदेश सेवानिवृत्तीच्या दिवशी निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना देण्यात आला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सामाजीक अंतर पाळून प्रातिनिधीक स्वरुपात आठ अधिकारी व कर्मचाऱ्यांना हे आदेश देण्यात आले. सेवानिवृत्तीच्या दिवशी निवृत्ती आदेश मिळाल्याने निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत आणि सूत्रसंचालन कुलसचिव डॉ. महानंद माने यांनी केले आणि आभार नियंत्रक श्री. विजय कोते यांनी मानले. या कार्यक्रमाला कोव्हीड-१९ परिस्थितीमुळे मोजके कर्मचारी सामाजीक अंतर ठेऊन उपस्थित होते.

मफुकृवि ई वार्ता
जून २०२१



वर्ष :१, अंक क्रं. : ६, जून २०२१

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे शुभहस्ते रोजंदारी मजूरांना नियुक्ती आदेश




**दि. २६ जून, २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म (जि. पुणे) येथील चार रोजंदारी मजुरांना कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे शुभहस्ते अकरा महिने कालावधी करीताचे आदेश देण्यात आले. माननीय न्यायालयाने दिलेल्या न्याय निर्णयानुसार सदरचे नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही तात्काळ करणे गरजेचे होते. परंतु सदर रोजंदारी मजुरांना त्यांच्या न्याय हक्कानुसार दि. ०१.०७.२०२० रोजी नियुक्ती आदेश देणे गरजेचे असतांना आदेश निर्गमीत करावयाची प्रक्रिया तांत्रिक बाबींचा आडोसा घेत जवळपास एक वर्षापासुन रखडवून रोजंदारी मजुरांना नियुक्ती आदेश मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आलेले होते. परंतु कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या कर्तव्य दक्षतेने व गतिमान प्रशासनाच्या संकल्पनेतुन सदर नियुक्ती आदेश निर्गमीत करण्याची कार्यवाही तात्काळ करण्यात आली. ह्या रोजंदारी मजुरांची कोरोना महामारीच्या काळात एक वर्षापासुन होणारी उपासमार थांबवून त्यांना तात्काळ न्याय दिल्याबद्दल कुलगुरुंचे सर्व स्तरातुन स्वागत करण्यात येत आहे.

मफुकृवि ई वार्ता
जून २०२१

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

वर्ष :१, अंक क्रं. : ६, जून २०२१

## कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे शुभहस्ते सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती आदेश प्रदान



**दि. २९ जून २०२१.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या आस्थापनेवरील सफाई कामगार पदावरुन विहीत वयोमानानुसार सेवा निवृत्त झालेल्या/सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्ती आदेश कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या शुभहस्ते मंगळवार दि. २९ जून, २०२१ रोजी देण्यात आले. लाड–पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्ती आदेश देण्याची कार्यवाही तात्काळ करणे गरजेचे होते. याप्रसंगी अधिष्ठाता (कृषि) डॉ. अशोक फरांदे, संचालक संशोधन व विस्तार शिक्षण डॉ. शरद गडाख, कुलसचिव डॉ. महानंद माने आणि नियंत्रक श्री. विजय कोते उपस्थित होते. सदर कर्मचाऱ्यांना वारसा हक्कानुसार आदेश देणे गरजेचे असतांना आदेश निर्गमीत करावयाची प्रक्रिया तांत्रिक बाबींचा आडोसा घेत जवळपास सहा महिन्यांपासुन रखडवून सदर सफाई कर्मचाऱ्यांना नियुक्ती आदेश मिळण्यापासून वंचित ठेवण्यात आलेले होते. परंतु, कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या कर्तव्य दक्षता व गतिमान प्रशासनाच्या संकल्पनेची भुमिका श्रीमती निकिता रोशन खोडे (मयत कै. रोशन खोडे यांच्या पत्नी) व श्री. नरेश मुन्सिलाल सिहोते (सेवानिवृत्त मुन्सिलाल सिहोते यांचा मुलगा) यांना नियुक्ती आदेश निर्गमीत करण्याच्या कृतीतुन निदर्शनास आली. ह्या सफाई कामगारांची कोरोना महामारीच्या काळात सहा महिन्यांपासुन होणारी उपासमार थांबवून त्यांना तात्काळ न्याय दिल्याबद्दल कुलगुरुंचे सर्व स्तरातुन स्वागत करण्यात येत आहे. या कामी कुलसचिव व त्यांचे कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचे मोलाचे सहाय्य झाले.

मफुकृवि ई वार्ता
जून २०२१

## भा.कृ.अ.प. शेतकरी प्रथम प्रकल्पाची संस्था सल्लागार समिती बैठकीचे आयोजन




**दि. २३ जून, २०२१**. शेतकरी उत्पादनाचे विपणन करण्यात कमी पडतो. शेतकऱ्यांनी एकत्र येवून विपणन व्यवस्थेवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. विपणन मजबुत झाल्यास शेतकरी समृध्द होईल असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत भारतीय कृषि अनुसंधान परिषदेच्या शेतकरी प्रथम कार्यक्रमाच्या संस्था सल्लागार समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. शरद गडाख बोलत होते. यावेळी अटारी, पुणेचे संचालक डॉ. लाखन सिंग, अहमदनगरचे कृषि सहसंचालक श्री. विलास नलगे, राहुरीचे तालुका कृषि अधिकारी श्री. महेंद्र ठोकळे आणि प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे उपस्थित होते. डॉ. गडाख पुढे म्हणाले की विद्यापीठाच्या तंत्रज्ञानाचा लाभ इतर गावातील शेतकऱ्यांना व्हावा. शेतकरी प्रथम प्रकल्पाचे एकात्मिक शेती पध्दती मॉडेलचा प्रसार मोठ्या प्रमाणावर होण्याची गरज आहे. यावेळी आपल्या मार्गदर्शनात डॉ. लाखन सिंग म्हणाले की शेतकरी प्रथम प्रकल्पांतर्गत चिंचविहिरे व कणगर गावात शेतकऱ्यांनी तंत्रज्ञानाचा वापर करुन प्रगती केली आहे. एकात्मिक शेती पध्दतीचा अवलंब चांगल्या पध्दतीने होत आहे. श्री. नलगे यांनी शेतकऱ्यांनी कृषि विभागाच्या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. मृद आरोग्य पत्रिकेचे महत्व त्यांनी विषद केले.

सदर बैठकीचे प्रास्ताविक प्रकल्पाचे प्रमुख समन्वयक डॉ. पंडित खर्डे यांनी केले. बैठकीसाठी चिंचविहिरे येथील श्री. मारुती गिते आणि कणगर गावातून श्री. प्रविण गाढे या शेतकऱ्यांना आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी आपले अनुभव सांगितले. बैठकीत सहसमन्वयक डॉ. संजय मंडकमाले, डॉ. नंदकुमार कुटे आणि डॉ. वसंत पोखरकर यांनी चर्चेत सहभाग घेतला. बैठकीचे सूत्रसंचालन सहसमन्वयक डॉ. सचिन सदाफळ तर आभार सहसमन्वयक डॉ. भगवान देशमुख यांनी मानले. बैठक यशस्वी करण्यासाठी श्री. विजय शेडगे व श्री. राहुल कोऱ्हाळे यांनी परिश्रम घेतले.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ६, जून २०२१

## देशी गोपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन




**दि. २ जून, २०२१.** देशी गाईंचे व्यवस्थापन करताना देशी गायीचे महत्व समजून घेणे महत्त्वाचे आहे. सध्या अनेक गोपालक देशी गाई पालनकडे वळताना दिसत आहे कारण देशी गाईची रोगप्रतिकार क्षमता, उत्तम असून दुधाची गुणवत्ता ही अतिशय चांगली असते तसेच देशी गाईच्या दुधाची मागणीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. देशी गायीचे दूध व दुग्धजन्य पदार्थांची मागणी लक्षात घेता गोपालकांनी एकत्र येऊन दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती करावी असे प्रतिपादन महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन व विस्तार शिक्षण संचालक डॉ. शरद गडाख यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्र, पुणे व कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने तीन दिवसीय ऑनलाइन देशी गोपालन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी अध्यक्षस्थानावरुन डॉ. गडाख बोलत होते. याप्रसंगी पुणे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुनील मासाळकर, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दिनकर कांबळे, डॉ. शिवाजी पाचपुते, डॉ. संजय मंडकमाले, प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने, डॉ. रामदास शेंडे उपस्थित होते.

डॉ. सुनील जाधव यांनी देशी गाईंचे पोषण व आहार, डॉ. सुनील अडांगळे यांनी वर्षभरासाठी हिरवा चारा नियोजन, डॉ. शांताराम गायकवाड यांनी तनावमुक्त देशी गोपालन, डॉ. दिगंबर मोकाट यांनी देशी गाईंच्या आहारात औषधी वनस्पतींचा वापर, डॉ. मनोज आवारी यांनी समतोल आहार व घरगुती खाद्य निर्मिती आणि डॉ. रोमा यांनी देशी गोपालनमध्ये होमिओपॅथी औषधांचा वापर या विषयांवर गोपालकांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. धीरज कंखरे यांनी तर आभार डॉ. सुनील अडांगळे यांनी मानले.

मफुकृवि ई वार्ता
जून २०२१

## जुलै महिन्यातील कामांचा तपशील

### बागायती कापूस

- पीक तणविरहीत ठेवण्यासाठी कुळवाच्या पाळ्या द्याव्यात.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आढळून आल्यास डायमेथोडाट ३० ई.सी. या किटकनाशकाची १५मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- फुलकिडीचा प्रादुर्भाव जास्त दिसून आल्यास फिप्रोनील ५ एस.सी. ३० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- आकस्मिक रोग दिसून आल्यास १.५ किलो युरीया व १.५५ किलो पालाश, १०० लिटर पाण्यात मिसळून प्रति झाडास १५० ते २०० मिली द्रावण झाडाच्या बुंध्यापाशी ओतावे.
- अति पावसामुळे (नैसर्गिकरित्या) पानेगळ होण्याची शक्यता असते, अशा वेळेस नॅप्थॅलिन ॲसेटिक ॲसीड (फ्लॅनोफिक्स) १०० मिली प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- बीटी कापूस लागवडीनंतर ६० दिवसांनी नत्र खताचा तिसरा हप्ता (५० किलो नत्र प्रति हेक्टर) द्यावा.
- बिगर बीटी कपाशीसाठी लागवडीनतर ६० दिवसांनी नत्र खताचा तिसरा हप्ता (४० किलो नत्र प्रति हेक्टर) द्यावा.

### ऊस

- आडसाली ऊस लागवडीसाठी जमिनीची पूर्व मशागत करुन रानबांधणी आखणी पूर्ण करावी.
- मध्यम जमिनीत एक मीटर अंतरावर तर भारी जमिनीत १.२० मीटर अंतरावर सरी उताराच्या आडवी सोडावी.
- सरी सोडण्यापूर्वी प्रति हेक्टरी ३० टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट वापरा. ऊस लागणीच्या वेळी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया), ८५ किलो स्फुरद (५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व ८५ किलो पालाश (१४५ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी सरी डोस पेरुन द्यावा.
- को.८६०३२ या जातीची लागण करतेवेळी ५० किलो नत्र (११० किलो युरिया ), १०० किलो स्फुरद (६२५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) व पालाश १०० किलो (१७० किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी वापरावा.
- आडसाली लागण करताना को.८६०३२ व को.एम.०२६५ या शिफारशीत जातींचा वापर करावा.
- ऊस बेणे लागण करण्यापूर्वी खवले कीड, पिठ्या ढेकूण, लोकरी मावा, पांढरी माशी या किडीच्या नियंत्रणासाठी ३००मिली मॅलॅथिऑन ५०टक्के प्रवाही अथवा डायमेथोएट २६५मिली ३० टक्के प्रवाही आणि १०० ग्रॅ बावीस्टीन (०.१ टक्के) १००लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०मिनिटे बुडवावे आणि तेच बेणे परत १००लिटर पाण्यात १०किलो प्रति हेक्टरी ॲसेटोबॅक्टर डायॲझोट्रॉपिकस आणि१.२५किलो स्फुरद विरघळविणारे जिवाणु प्रति हेक्टरी याप्रमाणे मिसळून तयार केलेल्या द्रावणात ३० मिनिटे बुडवून ठेवावे व नंतर लागणीसाठी वापरावे, त्यामुळे नत्राच्या मात्रेत ५०% व स्फुरदाच्या मात्रेत २५% इतकी बचत होते.
- वाळवी, खोडकिड व मुळ पोखरणारी अळीच्या बंदोबस्तासाठी क्लोरोपायरीफॉस २० टक्के प्रवाही २.५ लिटर १००० लिटर पाण्यात मिसळून ऊस लागणीनंतर वापश्यावर सरीतून प्रति हेक्टरी ओतावे.
- ऊस लागणीकरीता उसाच्या एक डोळा अथवा दोन डोळा टिपरीचा वापर करावा.

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
वर्ष :१, अंक क्रं. : ६, जून २०२१

**भात**

**पुर्नलागवड**

- रोपांच्या पुर्नलागवडीसाठी पारंपारीक पद्धतीने अथवा यंत्राच्या साह्याने चिखलणी करावी. हळव्या जातीची लागण पेरणीनंतर २१ते २५ दिवसांनी, निमगरव्या जातीची २३ते२७ दिवसांनी व गरव्या जातींची २५ ते ३० दिवसांनी करावी. एका चुडात २ ते ३ रोपे ठेवावीत.
- संकरित जातींसाठी एका चुडात फक्त १ ते२ रोपेच ठेवावीत.
- हळव्या जातींच्या रोपांची लावणी १५ द १५ सें.मी. तर निमगरव्या व गरव्या जातींची २० द१५सें.मी. अंतरावर करावी.
- सेंद्रीय खतांचा वापर चिखलणीच्या वेळी हेक्टरी १० मे.टन हिरवळीचे खत जमिनीत गाडावे. याकरीता धैंच्या अथवा ताग वापरावा. दुसरा मार्ग म्हणजे गिरीपुष्पाची शेताच्या बांधावर लागवड करावी. लागवडीनंतर दुसऱ्या वर्षापासून या झाडाचा पाला भात लावणीच्या ८ ते १० दिवस अगोदर शेतात गाडावा. गिरीपुष्पाची हिरवी पाने ३मे.टन प्रति हेक्टरी शेतात गाडल्यास नत्र खताकरता लागणाऱ्या खर्चात खूप बचत होते.
- रासायनिक खतांचा वापर भात लागवडीसाठी हेक्टरी १०० किलोग्रॅम नत्र, ५० किलोग्रॅम स्फुरद व ५० किलोग्रॅम पालाश या प्रमाणात रासायनिक खतांच्या मात्रेची शिफारस करण्यात आली आहे. हि खत मात्रा हळव्या जातींमध्ये लागणीच्या वेळी ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे. निमगरव्या व गरव्या जातींमध्ये लागणीच्यावेळी ४० टक्के नत्र आणि संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे. संकरीत जातींकरीता हेक्टरी १२० किलोग्रॅम नत्र, ५० किलोग्रॅम स्फुरद व ५० किलोग्रॅम पालाश या प्रमाणात रासायनिक खतांच्या मात्रेची शिफारस करण्यात आली आहे. ही खत मात्रा लागणीच्यावेळी ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे.

**कडधान्य**

**मूग आणि उडिद**

- पेरणीनंतर २०– २५ दिवसांनी पहिली व ३०– ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी करावी.
- कोळपणीनंतर दोन रोपातील तण काढण्यासाठी गरजेनुसार खुरपणी करावी.

**तूर**

- पेरणीनंतर १५–२० दिवसांनी विरळणी करुन कोळपणी करावी तसेच ३० दिवसांनी खुरपणी करावी व पीक तणविरहित ठेवावे.
- पेरणीनंतर ४५ दिवसांनी झाडांचा शेंडा ५ से.मी. वर खुडावा.

**नाचणी**

- पेरणीची वेळ : जून/जुलै
- पेरणीची पद्धत : पुर्नलागण/पेरणी
- मार्करच्या सहाय्याने रेषा पाडणे

- बियाणे (कि.ग्रॅ/हे.) : पुर्नलागण – ३ किलो/हेक्टरी
- पेरणी पद्धत : ५ किलो/हेक्टरी
- लागवडीचे अंतर : ३० – १० सें.मी.
- पेरणीची खोली : २ सें.मी. पर्यंत
- नांग्या भरणे / विरळणी करणे
- पुर्नलागणीची पद्धत : गादी वाफ्यात तयार केलेली २५–३० दिवसांची रोपे वापरतात.
- रासायनिक बीजप्रक्रिया नाचणी पिकाची धुळवाफ पेरणी करीता प्रति किलो बियाण्यास ३ ते ४ ग्रॅम फॉलीडॉल भुकटी लावावी. रोग नियंत्रणासाठी प्रति किलो बियाणांस २.५ ग्रॅम कार्बनडेंझीम प्रक्रिया करावी.
- बियाणे संस्करण बियाणे पेरणीपुर्वी प्रति किलो बियाण्यास प्रत्येकी २५ ग्रॅम अझोस्पिरिलम ब्रासिलेन्स + स्फुरद विरघळणारे जिवाणू संवर्धकाची बिजप्रक्रिया करावी.

### सोयाबीन

- पेंडीमेथीलीन तणनाशक १ ते १.५ ली. प्रती हेक्टरी पेरणीनंतर वाफशावर ६०० ते ७०० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. पीक उगवणीनंतर २१ दिवसांनी इमॅजिथॅपर क्रियाशिल घटक ०.१ ते ०.१५ किलो ५०० ते ६०० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी.

### फळबाग व्यवस्थापन

- **सिताफळ –** संकरीत जातीमध्ये कृत्रिम परागीभवन करावे. सिताफळावरील पिठया ढेकुण नियंत्रणासाठी जैवीक उपाय योजना करावी.
- **बोर –** नवीन फुटीच्या फांद्याची संख्या मर्यादीत ठेवुन झाडांना वळण देणे.
- **आवळा –** फुल धारणा व फळ धारणेच्या वेळी फळ पोखरणारी अळी व बी खाणाऱ्या भुंगेऱ्यांचे नियंत्रण करावे.
- **कागदी लिंबू –** पावसाचे जादा पाणी चराद्वारे बागेच्या बाहेर काढून द्यावे. आंबे बहाराच्या फळांची काढणी करावी. सिल्ला, मावा व पाने पोखरणारी अळी : डायमिथोएट २० मिली अथवा इमिडाक्लोप्रीड २.५ मिली/१० लि. पाणी याप्रमाणे फवारणी करावी. कॅंकर / खैऱ्या रोग : स्ट्रेप्टोसायक्लीन १ ग्रॅम + कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाणी शेंडेमर : कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम/ १० लि. पाणी

### भाजीपाला व्यवस्थापन

- उन्हाळी वेलवर्गीय भाजीपाला पिकांची काढणी करावी.
- उन्हाळी वांगी, मिरची, टोमॅटो पिकाची काढणी करावी.
- खरीप हंगामातील भाजीपाला पिकाचे लागवडीसाठी रान बांधणी करावी.लागवडीचे वेळी शेणखताचा वापर करावा.
- रासायनीक खत मात्रेच्या ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश लागवडीचे वेळी द्यावे.
- टोमॅटोचे ३ ते ४ आठवडे कालावधीचे रोप लागवडीस वापरावे.

- वांगी व मिरची पिकाचे सहा आठवडे कालावधीचे रोपे लागवडीसाठी वापरावे.
- लागवडीपूर्वी टोमॅटो, वांगी, मिरची, फ्लॉवर व कोबी रोपांची मुळे किटकनाशक, बुरशीनाशक तसेच जीवाणू खताचे द्रावणात बुडवावे.
- कांदा पिकाचे रोपवाटीकेतील रोपांचे किड व रोगापासून संरक्षण करावे.
- कांदा पिकाचे लागवडीसाठी शेत तयार करावे.
- फ्लॉवर व कोबीचे सहा आठवड्याचे रोपे लागवडीस वापरावे.
- खरीप हंगामातील वेलवर्गीय भाजीपाला पिकांची लागवड करावी उदा. दुधी भोपळा, कारली, दोडका, घोसाळी, तांबडा भोपळा इ.

## आले

- आंतरपिके जसे कोथिंबीर, झेंडू, मिरची, तूर, गवार यांची लागवड करावी.
- आले उत्पादनात वाढ होण्यासाठी तसेच आल्यामधील तंतुचे प्रमाण कमी करण्यासाठी २ टक्के युरिया आणि ४०० पीपीएम प्लॅनोफिक्सचे मिश्रण ६० आणि ७५ व्या दिवशी लागवडीनंतर फवारावे.
- आले पिकांत फुटव्यांची संख्या वाढण्यासाठी २०० पीपीएम इथरेलची ७५ व्या दिवसां पासून १५ दिवसांच्या अंतराने ३ फवारण्या कराव्यात.
- जमिनीच्या मगदूराप्रमाणे पाण्याचे नियोजन करावे.
- पावसाचे पाणी साचू देवू नये. पाण्याचा तात्काळ निचरा करावा.
- कंदमाशीचे नियंत्रण करावे: आले पिकास कंदमाशीसारख्या किडीचा मोठा उपद्रव होतो. या किडीची माशी डासासारखी पण आकाराने मोठी व काळसर रंगाची असते. माशीचे पाय शरीरापेक्षा लांब असतात. दोन्ही पंख पातळ व पारदर्शक असून त्यावर राखी रंगाचे ठिपके असतात. अंडी पांढरट रंगाची असतात. अळी पिवळसर असून त्यांना पाय नसतात. या किडीच्या अळया उघडया गड्डुयामध्ये शिरुन त्याच्यावर उपजिवीका करतात.

## पशुसंवर्धन

- पावसाळयात जनावरांच्या पिण्याच्या टाक्यामध्ये पावसाचे वाहत आलेले पाणी जाणार नाही हयाची दक्षता घ्यावी. पाण्याच्या हौदांची नियमीत स्वच्छता करुन चुना लावून घ्यावे.
- गायी म्हशी नुकत्याच प्रसव झाल्या असल्यास नवजात वासरांची विशेष दक्षता घेणे अत्यंत गरजेचे आहे. नवजात वासरांना कोरडया जागेवर, उबदार वातावरणात ठेवावे.
- वासरांना त्याच्या वजनाच्या १० टक्के इतका चीक दिवसातून ३ ते ४ वेळा विभागुन तीन दिवस द्यावा. त्यामुळे त्यांच्या मध्ये रोगप्रतिकार शक्ती वाढेल.
- संपूर्ण पावसाळयात स्तनदाहाचे प्रमाण वाढते. त्यासाठी दुध काढण्यापूर्वी व काढल्यानंतर जीवाणूनाशक द्रावण्याची कासेवर फवारणी करावी किंवा सडे द्रावणात बुडवावीत.

**अवजारे**

**फुले पीव्हीसी भात लावणी चौकट**

- १.२० मीटर द ०.४० मीटर आकाराची पीव्हीसी भात लावणी चौकट.
- भात पिकाच्या चार सूत्री तंत्रज्ञानांतर्गत, १५से.मी. द २५ से.मी. अंतरावर पुनर्लागवड करणे सोईचे होते.
- ब्रिक्रेट (गोळ्या) खतांचा वापर सुलभतेने करता येतो.
- नेहमीच्या पध्दती पेक्षा ५ – ६ मजूर प्रती हेक्टरी बचत होते व उत्पादनात ३०–३५ टक्के वाढ होते.
- शेतकऱ्यांना वापरण्यास सोपी, हलकी व कमी खर्चाची आहे.

**प्रकाशक** : **डॉ. शरद गडाख**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, कृषि विस्तार व संवाद विभाग
**डिझाईनर** : **श्री. राजेंद्र जांभळे**
**श्री. सिध्दार्थ साळवे**
मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २३९४/२०२१